बीड जिल्हा | रविवार, दि.22 जून 2025 | viveksindhu@gmail.com | वर्ष 45 वे | अंक क्र.73 | पाने 4 | किंमत : 2 रु. | WWW.Vivek Sindhu.com

छायाचित्रकार - सचिन सोमवंशी

# दैनिक विवेक सिंधु



# गजानन महाराजांच्या पालखीचे जोरदार स्वागत

अंबाजोगाई – शेगाव येथून निघालेल्या संत गजानन महाराज पालखीचे आज दुपारी तीनच्या सुमारास आगम न झाले. दर्शन घेण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. नागरिकांनी पालखीचे ठिकठिकाणी उत्स्फूर्तपणे स्वागत करुन दर्शन घेतले. बासष्ट वर्षाची परंपरा असलेल्या गजानन महाराज पालखीचे शहराच्या सीमेवर भाविकांनी गर्दी करीत मोठ्या भक्ती भावाने स्वागत करुन मनोभावे दर्शन घेतले. गजानन महाराजांच्या भक्तांनी मुख्य रस्त्यावर ठिकठिकांनी रांगोळ्या काढल्या होत्या, तर योगेश्वरी महाविद्यालयाच्या समोरील रस्त्यावर गजानन महाराज भक्त महिला मंडळाने साड्यांच्या पायघड्या घालून पालखी मार्गस्थ केली. अनेक ठिकाणी भक्तांनी स्वागत फलकही लावले होत.

प्रारंभी भगवानबाबा चौकात पालखीचे स्वागत करण्यात आले. या वेळी शासनाचे प्रतिनिधी म्हणून तहसीलदार विलास तरंगे, नायब तहसीलदार स्मिता बाहेती, तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बालासाहेब लोमटे, नगर परिषदेच्या वतीने स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी पालखीचे स्वागत करुन मनोभावे दर्शन घेतले. यावेळी शहरातील सर्व पक्षांच्या राजकीय नेते, कार्यकर्त्यांसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यानंतर पालखी अण्णाभाऊ साठे चौक – खडकपूरा –देशपांडे गल्ली – भट्ट गल्ली – मंडी बाजार – योगेश्वरी देवी मंदिर –गुरुवार पेठ – शिवाजी चौक – मोंढा मार्गे दत्त मंदिर येथे मुक्कामासाठी आली. याठिकाणी विश्रांती व व्यापारी असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रसादाचा लाभ घेवून पालखी योगेश्वरी मातेचे दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेवून मुक्कामासाठी यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाकडे प्रस्थान झाली.

विठू नामाचा गजर चालू होता . व्यापारी व नागरिकांनी वारकऱ्यांसाठी महाप्रसाद केला होता .या भागात यात्रेचे स्वरूप आले होते . भाविकांची मोठी गर्दी होती . प्रसादाचे व खेळण्यांची दुकाने उभारण्यात आली होती.

गजनान महाराजांची पालखी शहरातील मुख्य रस्त्यावर रुन जात असतांना शहरातील अनेक नागरीक, व्यापारी संघटना, वैयक्तिक प्रतिष्ठाने, मित्रांचे समुह, राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आदींनी एकत्र येवून दिंडीतील सहभागी वारकऱ्यांना फराळ, चहा–पाणी यांची मोफत व्यवस्था केले. पालखी मार्गस्थ होणाऱ्या रस्त्यावर दुतर्फा दुकाने थाटल्यामुळे जत्रेचे स्वरुप आले होते.

**• महसुल दिंडीचा सहभाग**

यावर्षी प्रथमच जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार गजानन महाराज यांच्या दिंडी समवेत महसुली दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. शासनाच्या वतीने सर्वसामान्य माणसांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध सोयी सवलती व सुविधांची माहिती नागरीकांचा व्हावी यासाठी या महसुल दिंडीचे आयोजन करण्यात आले असल्याचे तहसीलदार विलास तरंगे यांनी सांगितले. यावेळी अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, नायब तहसीलदार स्मिता बाहेती व महसूल विभागाच्या इतर अधिकारी कर्मचारी यांचा समावेश होता.

**• आरती व महाप्रसादाचे आयोजन**

संत गजानन महाराजांच्या पालखीची सकाळी विधीवत महापुजा करण्यात येवून महानैवेद्य दाखवण्यात येईल. यानंतर संत गजानन महाराजांच्या भक्त रमेश कापसे परिवाराकडुन गेली अनेक वर्षांच्या प्रथेनुसार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून पालखीतील सहभागी वारकरी या महाप्रसादाचा लाभ घेवून पालखी कळंब कडे मार्गस्थ होणार आहे.

# लोखंडी सावरगाव ते बर्दापूर महामार्गाचे होणार चौपदरीकरण

## वार्षिक आराखड्यात समावेश; केंद्रीय मंत्री नितीन गडकरींनी केली वचनपूर्ती ▸ लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा रस्ता चौपदरीकरणाचा प्रस्ताव तयार करण्याचेही आदेश

अंबाजोगाई : शहराजवळून जाणारा ५४८ बी हा महामार्गावरील बर्दापूर ते लोखंडी सावरगाव या टप्प्याचे चौपदरीकरण करण्याचे आ. नमिता मुंदडा यांच्या प्रचारसभेत दिलेले वचन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पूर्ण केले आहे. केंद्र सरकारच्या वार्षिक आराखड्यात या मार्गाच्या चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे.

अंबाजोगाई आणि लातूरला जोडणाऱ्या ५४८ बी या महामार्गावर बर्दापूरच्या पुढे येताच चार पदरी रस्त्याचे अचानक दोन पदरीत रूपांतर होते. या ठिकाणी येणाऱ्या वाहनांच्या गतीचा अचानक अडथळा होत असल्यामुळे याठिकाणी वारंवार गंभीर अपघात घडत आले आहेत. अनेक निष्पाप नागरिकांचे जीव या अपुऱ्या आणि असुरक्षित रस्त्यामुळे गेले आहेत. त्यामुळे या मार्गाचे चौपदरीकरण करण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सातत्याने केली जात होती.

माजी खासदार प्रीतमताई मुंडे आणि अंबाजोगाईच्या आमदार नमिता मुंदडा यांनी ही नागरिकांची सुरक्षितता लक्षात घेऊन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे वारंवार मागणी केली. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभेच्या निवडणुकीदरम्यान अंबाजोगाई येथे झालेल्या आ. नमिता मुंदडा प्रचारसभेत गडकरी यांनी या प्रकल्पासाठी सहा महिन्यांत निर्णय घेण्याचे जाहीर आश्वासन दिले होते.



त्यानंतरही आमदार नमिता मुंदडा यांनी विधीमंडळ अधिवेशनाच्या काळात गडकरी यांची भेट घेऊन पुन्हा एकदा हा मुद्दा सविस्तर मांडला. या सातत्यपूर्ण प्रयत्नांना अखेर यश आले असून रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालय, भारत सरकार यांनी २०२५–२६ च्या वार्षिक आराखड्यात लोखंडी सावरगाव ते बर्दापूर या महामार्गाच्या १८ किमी लांबीच्या टप्प्याच्या चौपदरीकरणाचा समावेश अधिकृतरीत्या केला आहे. या कामासाठी सुमारे २५० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून लवकरच निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

या निर्णयामुळे बर्दापूरच्या पुढे अचानक दोन पदरी होणाऱ्या रस्त्यामुळे निर्माण होणाऱ्या अपघातांची साखळी खंडीत होईल. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना आता सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवास अनुभवता येणार आहे. या निर्णयाबद्दल आमदार नमिता मुंदडा यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे विशेष आभार मानले असून हा निर्णय प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, या निर्णयाबद्दल नागरिकांतून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. रस्त्याचे काम नियोजित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण व्हावे, अशी अपेक्षा आता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**• मांजरसुंबापर्यंत रस्ता चौपदरीकरणासाठी प्रयत्न सुरु : आ. नमिता मुंदडा**

**• सध्या दोन पदरी असलेल्या लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या मार्गाचेही चौपदरीकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश मंत्री नितीन गडकरी यांनी दिल्याचे आ. मुंदडा यांनी सांगितले.**

# सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेनं संपवलं जीवन




कडा : राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे चित्र समोर येत आहे. अशाच प्रकारची एक हृदयद्रावक घटना बीड जिल्ह्यात घडली आहे.

सासरच्या मंडळींकडून पैशासाठी होणाऱ्या छळाला कंटाळून एका विवाहितेनं जीवन संपवले. नवीन घर बांधण्यासाठी पैसे घेऊन ये, तू आणि तुझा नवरा वेगळे घर बांधून राहा, तसेच सामाईक शेतातील घास कापण्याच्या कारणावरून सतत शिवीगाळ अशाप्रकारचा शारीरिक व मानसिक त्रास सहन करत राहिलेल्या विवाहितेने विषारी द्रव्य प्राशन करत जीवन संपविल्याची घटना अंभोरा येथे घडली. प्रियंका बापू खाकाळ (वय ३०) असे मयत विवाहितेचे नाव आहे.

सासरचांच्या विरोधात अंभोरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. वर्षापूर्वी दीर ज्ञानेश्वर याचा विवाह झाल्यानंतर प्रियंकाचा पैशासाठी छळ सुरू झाला. याला कंटाळूनच प्रियंकाने १३ जून रोजी विषारी द्रव प्राशन केले. उपचारासाठी तिला अहिल्यानगर येथील खासगी रुग्णालयात दाखल केले होते; परंतु बुधवारी रात्री तिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला .मृत विवाहितेचे वडील जालिंदर मारुती वामन यांच्या फिर्यादीवरून गुरुवारी अंभोरा पोलिस ठाण्यात सासरा धर्मा विठोबा खाकाळ, सासू सुशीला धर्मा खाकाळ, दीर ज्ञानेश्वर धर्मा खाकाळ, जाऊ सविता ज्ञानेश्वर खाकाळ विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# केज येथे रस्ता रोको आंदोलन



केज – केज शहरातील क्रांती नगर भागातील विविध प्रश्न व समस्या सोडविण्यात याव्यात या मागणीसाठी झोपडपट्टी हक्क संघर्ष समितीच्या वतीने २० जून रोजी सकाळी ११ वाजता कानडी रस्त्यावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी अजित ढोपे यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आंदोलनात बाबुराव गालफाडे, लक्ष्मण जाधव, सय्यद शकील, योगेश गायकवाड, नागनाथ जावळे, ईरफान पठाण, सय्यद आखिल, बालासाहेब पवार, प्रेम गायकवाड, महादेव लांडगे, अरविंद चाळक, भीमराव हजारे, अच्युतराव मस्के, गंपू मस्के, समाधान मस्के, रणजित मस्के यांच्यासह क्रांती नगर सर्व महिला, नागरिक, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुलगा जिवंत पाहिजे असेल तर 50 हजार रुपये टाका

## » धमकी देत जबर मारहाण केल्याची घटना धारूर तालुक्यात घडली

धारूर– उसने घेतलेल्या दहा हजार रुपयांचे व्याजासह ८० हजार रुपये झाल्याने ते वसूल करण्यासाठी एका तरुणाचे चौघा जणांनी अपहरण करत मुलगा जिवंत पाहिजे असेल तर पन्नास हजार टाका नसता तो तुम्हाला दिसणार नाही, अशी धमकी देत त्याला जबर मारहाण केल्याची घटना गुरुवारी धारूर तालुक्यात घडली. या प्रकरणात धारूर पोलिसांनी तातडीने तपास करत अंबाजोगाई जवळील साकुर येथून दोघांना अटक केली आहे तर दोघेजण फरार आहेत.



मैंदवाडी येथील कृष्णा मैंद याने धनराज चाटे, पृथ्वीराज राख, परमेश्वर आघाव व अन्य एकाकडून दहा हजार रुपये उसने घेतले होत. त्याचे व्याजासह ८० हजार झाल्याचे कारण सांगत या चौघांनी कृष्णाला स्कॉर्पिओमध्ये बसवत अंबाज गाईकडे घेऊन गेले. कृष्णा याने घरी फोन लावत झालेल्या प्रकाराची माहिती त्याच्या आईला दिली.यावेळी त्यांच्यापैकी एकाने कृष्णाच्या आईला तुमचा मुलगा जिवंत पाहिजे असेल तर आताच्या आता पन्नास हजार रुपये टाका नसता तर तुम्हाला दिसणार नाही असे म्हणत फोन कट केला. यानंतर कृष्णाच्या आईने गावातील लोकांच्या मदतीने धारूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिस निरीक्षक वाघमोडे यांनी तातडीने सूत्रे हलवत तपास सुरू केला. यावेळी आरोपींवर कारवाई करत पृथ्वीराज राख व परमेश्वर आघाव या दोघांना ताब्यात घेतले तर धनराज चाटे व अन्य एक जण फरार झाला. त्यांच्याकडे चौकशी केल्यानंतर या चौघांनी कृष्णा याला मारहाण करत येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या रोडवर जखमी अवस्थेत सोडले असल्याचे सांगितले. कृष्णा मैंद याला दहा हजार रुपये एक हजार रुपये रोजाप्रमाणे दिले होते त्याबद्दल त्याच्याकडे ८० हजार रुपये झाले होते व त्याने रोख तीस हजार रुपये दिल्यानंतर ही पन्नास हजार रुपये बाकी असल्याने त्याला उचलून आणले होते असे त्याने सांगितले.

# गेवराई शहरातील छत्रपती मल्टीस्टेट सोसायटी अखेर पोलिस प्रशासनाने केली सील

गेवराई : बीडमधील गेवराई शहरातील छत्रपती मल्टिस्टेटला अखेर आज शुक्रवारी पोलीस प्रशासनाने सिल केले असून, ठेविदारास कोट्यावधीचा चुना लाऊन चेअरमन संतोष भंडारी परागंदा झाला आहे. बीडमधील गेवराईच्या संतोष भंडारी याने छत्रपती मल्टिस्टेट या नावाची सोसायटी काढून त्याने राज्यातील विविध शहरात या सोसायटीच्या शाखा कार्यरत आहेत. मुख्य शाखा गेवराई शहरात जुन्या बसस्थानक धुळे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर आहे.



जास्त व्याज दराचे अमिष दाखवून चेअरमन संतोष भंडारी याच्या छत्रपती मल्टीस्टेट सोसायटीत कोट्यावधीच्या ठेवी तालुक्यातील शेतमजुर, शेतकरी,व्यावसायिक, तसेच महिला यांनी लाखो ठेवी केल्या. मात्र, सोसायटीतील जमा झालेली कोट्यावधीच्या ठेवी मुदत होऊन देखील मिळत नसल्याने ठेविदार त्रस्त झाले. त्यातच खळेगाव येथील सुरेश जाधव या शेतक–याची एक नव्हे तर तब्बल नऊ लाख रुपयाची ठेव सोसायटीत गुतंल्याने चकरा मारुन ही मिळत नसल्याने या शेतक–याने अखेर जीवन यात्रा संपविली.

यामुळे गेवराई तालुक्यात एकच खळबळ उडाली. या घटनेनंतर दोषी चेअरमन संतोष भंडारी याच्याविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आज सकाळीच पोलीस प्रशासनाकडून गेवराई शहरातील असलेल्या छत्रपती मल्टीस्टेट सोसायटीला सिल करण्यात आले आहे.

# छत्रपती मल्टीस्टेटचा आणखी एक बळी

## केज तालुक्यातील तरुणाने नैराश्यातून संपवले जीवन

केज/गेवराई : गेवराई येथील छत्रपती मल्टीस्टेटमधील ठेवीदारांच्या आत्महत्यांचे सत्र थांबताना दिसत नाही. शेतकरी सुरेश जाधव यांच्या आत्महत्येनंतर आता आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. याच मल्टीस्टेटमध्ये गुंतवलेले एक लाख रुपये बुडल्याच्या नैराश्यातून, केज तालुक्यातील एका होतकरू कृषी पदवीधर तरुणाने दीड महिन्यापूर्वीच आपले जीवन संपवले होते. ही घटना आता उघडकीस आली आहे.



सुरज शिवाजी तांदळे (रा. कोरेगाव, ता. केज) असे आत्महत्या केलेल्या या तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे मल्टीस्टेट घोटाळ्याची तीव्रता आणि त्याचे सर्वसामान्यांच्या जीवनावरील भीषण परिणाम पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत.

▸ पान 3 वर

# परळी शहरात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



परळी – देशाचे लोकप्रिय पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्रांच्या १९३ देशांपैकी १७५ देशांच्या सहप्रतिनिधींनी या प्रस्तावाला पाठींबा दिला होता. त्यानुसार दरवर्षी २१ जून या दिवशी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा केला जातो.

त्या अनुषंगाने लोकनेत्या मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे साहेब आणि मा. खा. डॉ प्रीतमताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ शहर भाजपा व जिजामाता गार्डन क्लब, पतंजली योग समिती, वैद्यनाथ बँक यांच्यावतीने जिजामाता गार्डन येथे योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी अनेक वर्ष परळी शहरांमध्ये योगाचे प्रशिक्षण देणाऱ्या विविध ठिकाणी योग पुरस्कार प्राप्त योगशिक्षिका सौ. सरला उपाध्याय, आणि त्यांच्या सहशिक्षिका सौ. शालिनी बोधे यांचा भारतीय जनता पार्टीच्या शहराध्यक्ष सौ. उमाताई समशेट्टी यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्याच्या मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांचे गौरवपत्र व शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी सौ समशेट्टी यांनी योगा बद्दल माहिती दिली तसेच योगाचे महत्त्व सांगितले. दररोज योग करण्याचे अनेक फायदे आहेत. शरीर आणि मन शांत करण्यासाठी योग खूप फायदेशीर मानला जातो. योग केल्याने आपल्या शरीराला ऊर्जा मिळते. स्नायूंची ताकद वाढते. तसेच यामुळे तुमची श्वसन, ऊर्जा आणि चैतन्य सुधारते.

यावेळी सोमेंद्र शास्त्री यांना स्व. वंदना पारसेवार प्रतिष्ठान तर्फे सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमास नगरपालिकेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे, भाजपाचे ज्येष्ठ नेते विकासराव डुबे, वैजनाथ ताटीपामल, नागनाथ पारसेवार, राजेश कोलवार, परळीतील प्रसिद्ध व्यापारी गुलाबराव शेटे, सुभाष तोतला, ब्रिजलाल मुंदडा, चंद्रकांत मुंडे, काकानी सर, रेपे सर, चित्राताई देशपांडे, यांच्यासह महिला व पुरुषांची लक्षणीय उपस्थिती होती.

# कुख्यात दरोडेखोराच्या आवळल्या मुसक्या

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

बीड – बीड जिल्ह्यामध्ये कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत गंभीर गुन्हे असलेल्या आरोपींविरोधात एमपीडीए अंतर्गतकारवाया करत आहेत.

आतापर्यंत अनेकांना जेलमध्ये पाठवण्यात आले. शुक्रवारी कुख्यात दरोडेखोराच्या स्थानीक गुन्हे शाखेने मुसक्या आवळून त्यास जेरबंद केले आहे. दिनांक २०.०६.२०२५ रोजी महादेव भगवान दळवे वय ५४ वर्ष, रा बालेपीर बीड यांनी पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, त्याचे राहते घरासमोरुन दुचाकी कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी हॅन्डल लॉक तोडुन चोरुन नेली आहे. या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. या दाखल गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे सुचना स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या. त्या नुसार स्थानिक गुन्हे शाखेने गुन्हा उघडकीस आणण्याचे प्रयत्न सुरु केले व दिनांक २०.०६.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, हा गुन्हा अतुल विक्रम वाघमारे याने `ला. आरोपी अतुल विक्रम वाघमारे हा संभाजीनगर, बीड येथील किरायच्या राहत्या घराचे जवळ थांबला आहे. या माहीती वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने छापा मारून पकडले. त्याचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपणीच्या पाच दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. सदर मोटार सायकल बाबत विचारणा केली असता सदरील मोटार सायकली हया बीड परीसरात ३०३(२) बी.एन.एस मधील असल्याची खात्री झाली. आरोपीने एकुण पाच मोटार सायकली चोरल्याचे कबुल केले. आरोपी व पाच दुचाकी पुढील तपासकामी पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात दिले आहेत. आरोपी अतुल विक्रम वाघमारे याचेवर दरोडेसारखे बरेच गुन्हे दाखल असल्याचे पोलीस अभिलेखावरुन दिसुन आले. ही कारवाई नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर,

अपर पोलीस अधीक्षक, बीड, शिवाजी बंटेवाड, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मारोती कांबळे, विकास राठोड, भागवत शेलार, दिपक खांडेकर, आशपाक शेख, चालक संजय जायभाये यांनी केली आहे.

# सोहम योगा ग्रुपच्या वतीने अंबाजोगाईत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

अंबाजोगाई – सोहम योगा ग्रुपच्या वतीने मनस्विनी महिला प्रकल्प अंबाजोगाई येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने सकाळी ०६.३० – ०७.३० या कालावधीमध्ये डॉ.संतोष कदम यांच्या मार्गदर्शनात उपस्थितांनी योग अभ्यास केला. याच ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिन सप्रेम शुभेच्छा समारोह संपन्न झाला. समारोहाची अध्यक्षता माननीय महेंद्र निकाळजे यांनी भूषविली तर प्रमुख अतिथी म्हणून मा.डॉ.अरुंधती पाटील, मा.गणेश जोशी गुरुजी, मा. बालाजी कचरे, मा.अजितदादा देशमुख, मा.नाथ भाऊ रेड्डी आणि डॉ.संतोष कदम यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन शिवाजीराव डोईफोडे यांनी केले तर प्रास्ताविक ॲड.बाळासाहेब लोमटे यांनी केले. शेवटी आभार प्रदर्शन योगेश घुंडरे यांनी केले.

या समारोहात प्रामुख्याने डॉ. संतोष कदम यांना महेंद्र निकाळजे यांच्या



वतीने दिलेली स्वास्थ्य प्रहरी पुरस्कार राशी रु. ५०००/– डॉ.अरुंधती पाटील यांच्या हस्ते देण्यात आली.

समारोह प्रास्ताविकात एडवोकेट बाळासाहेब लोमटे यांनी विस्तृतपणे योग इतिहास, भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवरील योग प्रचार, मानवी जीवनासाठी योगाचे महत्त्व व डॉ.संतोष कदम यांचे समर्पित योगदान यावर मनोगत व्यक्त केले.

गणेश जोशी गुरुजी यांनी योगासनाने शरीर, वात, मन शुद्ध होते म्हणून विचार, कर्म, फळ शुद्ध होते, असे संबोधित केले व इतरांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या डॉ.संतोष कदम यांच्या प्रति स्तुती सुमनांचा वर्षाव केला.

मा.बाळासाहेब कचरे यांनी, मी नियमित व्यायाम करतो, माझे पूर्ण कुटुंब योगासनाबाबत सचित आहे व मी नियमित आंतरराष्ट्रीय योगासन दिनाला उपस्थित असतो असे सांगितले. आदर्श शेतकरी तथा ड्छड पतसंस्थेचे अध्यक्ष मा.नाथ भाऊ म्हणाले की, कौटुंबिक व व्यावसायिक स्थैर्यासाठी योग साधना आवश्यक आहे. डॉ.अरुंधती पाटील म्हणाल्या की शारीरिक मानसिक तंदुरुस्ती व संतुलित जीवन जगण्यासाठी योग आवश्यक आहे. अलीकडे अंबाजोगाईत योगमय वातावरणाचे श्रेय डॉ.संतोष कदम यांनाच आहे. त्याचबरोबर डॉ.संतोष कदम यांना स्वास्थ्य प्रहरी पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी रुपेश तापडिया, श्रीकांत मुंदडा, प्रमोद देशमुख, किरण सेलमोहकर, सुदर्शन चव्हाण, रवी मुंदडा, नरेश ढगे, सतीश गंगणे, पवन चोपडा, केशव कदम, मनोज निकम, सोहम कदम, रमेश उर्फ बाळासाहेब बजाज, अर्णव कदम, दिलीप तांबारे, बापूसाहेब केंद्रे, मयूर शेळके, समर्थ लोमटे, दिगंबर देशमुख, ज्योतिरादित्य कदम, शिवम पडोळे, रामभाऊ खटमळ, कल्पना गोरे, बेबी फुके, अंजली कोदरकर व इत्यादी सोहम योगा ग्रुप च्या वतीने सर्व सदस्यांनी आपले अमूल्य योगदान दिले.

# शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध

बीड – राज्यात विविध योजनांमध्ये बसविण्यात आलेल्या एकूण सौर कृषी पंपांची संख्या ५ लाख ६५ हजारांवर पोहोचली असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आणखी पाच लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. सौर कृषी पंप बसविल्यानंतर त्यात काही बिघाड होण्याच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला असून शेतकऱ्यांना घरबसल्या फोनवरून अथवा ऑनलाईन तक्रार करता येईल, अशी सुविधा उपलब्ध केली आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे. मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे आणि मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स कोसळून नुकसान झाले. अशा प्रकारच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर पॅनेलची नासधूस होणे, सौर ऊर्जा संच काम करत नाही, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे.लाभार्थी शेतकऱ्यांना महावितरणच्या टोल फ्री नंबरवर फोन करून किंवा महावितरणच्या संबंधित वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करून किंवा थेट संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर नोंदणी करून तक्रार नोंदविता येईल.

# पाली येथे योग दिन उत्साहात साजरा



बीड (प्रतिनिधी)– पीएम श्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, पाली येथे २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन योगसाधक राज्य आदर्श शिक्षक पंढरीनाथ क्षीरसागर सर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने व प्राणायाम करुन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. शाळेचे मुख्याध्यापक कांतीलाल लाड सर यांनी योग दिनाचे महत्त्व विशद करताना सांगितले की, योग ही आपल्या प्राचीन संस्कृतीची देणगी असून आरोग्यासाठी त्याचा विशेष लाभ होतो. त्यांनी नियमित योगाभ्यासाचे महत्त्व पटवून दिले.

योगसत्रात विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, अनुलोम–विलोम, भ्रामरी प्राणायाम आदी आसनांचे सराव उत्स्फूर्तपणे केले. शारीरिक लवचिकता, मनाची एकाग्रता आणि तणावमुक्त जीवनासाठी योग कसा उपयुक्त आहे यावर मार्गदर्शन झाले. काही विद्यार्थ्यांनी योगावर भाषणे, कविता व गीत सादर केली. या कार्यक्रमासाठी शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये तळेकर सर, आघाव सर, राठोड सर, पायके सर, डोंगर सर, साळुंखे सर, काब्दे मॅडम, मुंडे मॅडम, म्हेत्रे मॅडम, हंगे मॅडम, सांगळे मॅडम, वाकचौरे मॅडम, खाडे मॅडम, मुळे मॅडम, जगताप मॅडम, सवई मॅडम व जाधव मॅडम यांनी विशेष उपस्थिती लावली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी नियमित योगाभ्यासाचा संकल्प केला. श्रीयुत राठोड सर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागृती निर्माण झाली असून, सर्वांनी नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.

# आधार मल्टीस्टेटकडून छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान

## मान्यवरांना पुरस्कार, गुणवंतांचा गुणगौरव

अंबाजोगाई (प्रतिनिधी) – येथील आधार मल्टीस्टेट को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिन व आर्थिक साक्षरता अभियान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. प्रल्हाद लुलेकर यांचे व्याख्यान, विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करणे तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आला असल्याची माहिती आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी दिली.

हा समारंभ गुरूवार, दिनांक २६ जून २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता अंबाजोगाई येथे आधार मल्टीस्टेटच्या आधार भवन 'अजिंठा हॉल' मध्ये आयोजित करण्यात आला आहे. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे माजी मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांचे 'डॉ.बी.आर.आंबेडकर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती सणा प्रमाणे साजरी करा



दिपक वजाळे (उपजिल्हाधिकारी) | प्रा.डॉ.देविदास खोडेवाड (साहित्यिक) | डॉ.दिपक कटारे (कार्डीओलॉजीस्ट) | प्रकाश मर्लेचा (उद्योजक) | ॲड.संतोष पवार (सामाजिक कार्यकर्ते)

असे का म्हटले होते' या विषयावर व्याख्यान होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जेष्ठ साहित्यिक तथा खोलेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे हे भूषविणार आहेत. या समारंभात समाजसेवा पुरस्कार – ॲड.संतोष पवार (आधार माणुसकीचा), उत्कृष्ट प्रशासन अधिकारी पुरस्कार – दीपक वजाळे (उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई), विद्याभूषण पुरस्कार – कार्डिओलॉजिस्ट डॉ. दीपक कटारे (अंबाजोगाई, लातूर) , उद्योगभूषण पुरस्कार – प्रकाश प्रताप मर्लेचा (संचालक, प्रेरणा ड्रेसेस, अंबाजोगाई) यांना तर उत्कृष्ट साहित्य पुरस्कार – प्रा.डॉ.देविदास खोडेवाड (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई) या मान्यवरांना जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांचे वितरण ही गुरूवार दिनांक २६ जुन रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरचे मराठी विभागप्रमुख तथा ज्येष्ठ साहित्यिक डॉ.प्रल्हाद लुलेकर यांच्या हस्ते केले जाणार आहे. अशी माहिती चेअरमन ॲड.सुनील सौंदरमल यांनी दिली. आधार मल्टीस्टेट ही सहकार क्षेत्रातील काम करणारी अग्रगण्य संस्था आहे. ही केवळ अर्थ सेवा करीत नसून अर्थ क्षेत्रा बरोबरच समाजसेवेचे व्रत ही या संस्थेने अंगीकारले आहे. मागील १३ वर्षांपासून ही संस्था सामाजिक उपक्रमात नेहमीच अग्रेसर राहिलेली आहे. आजपर्यंत आधार मल्टिस्टेटच्या माध्यमातून विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जवळपास ४० मान्यवरांना सदरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच इयत्ता दहावी आणि बारावी तसेच इतरही अनेक क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट गुण मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान केला जाणार आहे. मल्टिस्टेटच्या वतीने दरवर्षी महिलांसाठी जागतिक महिला दिनाच्या औचित्याने महिलांचा सन्मान केला जातो. मकर संक्रांतीनिमित्त हाळदी – कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. तसेच होतकरू महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांना स्वयंरोजगार निर्मिती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. सर्व महापुरूषांची जयंती तसेच शहरात नवीन आलेले अधिकारी यांचा सन्मान करणे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणे आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी या संस्थेच्या माध्यमातून प्रयत्न केले जातात. याच सामाजिक उपक्रमाचा एक भाग म्हणून या वर्षी देखील गुरूवार, दिनांक २६ जून रोजी विविध मान्यवरांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असल्याचे ॲड.सुनील सौंदरमल यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

हे पत्रक संपादक, मुद्रक, मालक व प्रकाशक अभिजीत नानासाहेब जगताप यांनी योगेश्वरी मुद्रणालय, अंबाजोगाई येथे छापून दैनिक विवेक सिंधु कार्यालय, नगर परिषद व्यापारी संकुल (संकुल क्र.४३,४४) अंबाजोगाई पिन–४३१५१७ जि.बीड (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले आहे. संस्थापक संपादक – प्रा.नानासाहेब गाठाळ ✻ संपादक– अभिजीत जगताप ✻ वृत्तपत्राचा नोंदणी क्र.६५७८८/८५ ✻ फोन–२४७२७०, मो :–९७६४०३३१११,९७६५५०००८८

## रजिस्टर्ड खरेदीखत हरवले आहे

**सौ.शिवनंदा भगवान लहाने, रा.लहानेवाडी ता.रेणापुर जि.लातूर** या नावाचे नगर परिषद कक्षेतील समर्थ नगर भागा मधील सर्व्हे नं.१६९ मधील प्लॉट नं.७१ म्यु.घर नं.९-१७६१ या मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत **अनु क्रं.४९९३/१-१६/२००३ , दि.१८/०९/२००३** ची मुळ नक्कल ज्याची चतुःसिमा - पुर्व-पश्चिम-२० फुट (६ मीटर), दक्षिणोत्तर -५० फुट (१५ मीटर) ज्याचे एकुण क्षेत्रफळ - ९० चौरस मीटर, चतुःसिमा - पुर्वे स - तुमचा याच प्लॉट नं. ७१ घर नं.९-१७६१ मधील अर्धा भाग, पश्चिमेस- प्लॉट नं.७०, दक्षिण- समर्थनगर सहकारी गृह निर्माण संस्था मर्या. अंबाजोगाईची जमीन, उत्तर - १२ मीटर रूंदीचा रस्ता तसेच या प्लॉटची रजिस्टर्ड खरेदीखत अनु **क्रं.४९९३/१-१६/२००३** ची मुळ नक्कल अशी आहे. **ते दि.१५/०५/२०२५** रोजी सकाळी अंदाजे ११.३० वाजण्याच्या सुमास रेणापुर ते अंबाजोगाई कडे जात असताना प्रवासात गहाळ झाले (हरवले) आहे. तरी ज्या कोणास सापडल्यास त्यांनी खालील पत्यावर संपर्क साधावा.

**पत्ता- सौ.शिवनंदा भगवान लहाने, रा.समर्थ नगर परळी रोड अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड मो.९११२९७४७३३**

## मुक्ताईंची पालखी... पान ४ वरून

मुक्ताईच्या पावलांशी आपली नाळ जोडली.

सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेनं संपवलं जीवन चिंतेश्वर मंदिरापर्यंत सारा रस्ता फुलांनी सजवलेला, रांगोळ्यांनी नटलेला आणि श्रद्धेच्या मनोऱ्यांनी उठून दिसत होता. फुलांची उधळण, जलसेवा, पादुकांवर अभिषेक, कीर्तन, हरिपाठ... सगळं जणू एका दिव्य अनुभूतीत एकवटलं होतं. शुक्रवारी सकाळी पारंपरिक पद्धतीने गढ़ी परिसरात गोल रिंगण सोहळा मोठ्या भक्तिभावाने पार पडला.

पालखीभोवती घोड्यांची रिंगणं, वारकऱ्यांची गर्दी, आणि मुक्ताईच्या जयघोषांनी आसमंत भरून गेला. रिंगण पाहण्यासाठी शेकडो भाविकांनी गढी परिसर गजबजून टाकला होता. अनेकांना डोळे भरून आले, काहींनी पाया पडताना मुक्ताईच्या रथात मनसोक्त भाव अर्पण केला.

## ग्रामीण विद्यार्थ्यांनी... पान ४ वरून

यश संपादन करू शकले. विद्यार्थ्यांनी निश्चितच स्पर्धा परीक्षेला न भीता सामोरे जावे. कोणतीही गोष्ट अशक्य नाही, असे मत मांडले. तर खुळे यांनी वैशाली ही एक गुणी विद्यार्थिनी असल्याचे सांगून सातत्याने खेळामध्ये असो. अभ्यासात असो, तिची जिद्द, चिकाटी विद्यार्थिनी समोर मांडली. निश्चितच याची प्रेरणा घेऊन विद्यार्थिनी यशाच्या शिखरावर जातील अशी अपेक्षा व्यक्त केली.

सूत्रसंचालन शिक्षक गिरी यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक नाईकनवरे यांनी केले.

## पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे... पान ४ वरून

दिपक फुलारी, क्रीडा विभागप्रमुख श्री.चव्हाण यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना कुलकर्णी म्हणाले की, रोज व्यायाम करणं ही प्रत्येकाची गरज ज्यांनी ओळखली अशी माणसं सातत्य कधीच सोडत नाहीत. धावपळीच्या युगात आत्मचैतन्य वाढवून मन:शांतीसाठी योगाचे फायदे होतात. प्रत्येक माणूस निरोगी राहण्याचा प्रयत्न करतो. मात्र कोणती ही गोष्ट स्वत: मनावर घेणे महत्वाचे वाटते. कुणी सुचवलं म्हणून करण्यापेक्षा किंवा २१ जुन योग दिनानिमित्त करण्यापेक्षा यातलं सातत्य प्रत्येकाच्या शरीर हितासाठी महत्वाचं वाटतं. ध्यानधारणा प्रत्येकाची गरज सध्याच्या काळात झाली आहे. वास्तविक पहाता योग ध्यानधारण या परंपरा पुरातन काळापासून चालत आल्या आहेत. ऋषी-महाऋषींनी यावर आधारित सदृढ जीवनावर यश मिळवले. अलीकडच्या काळात देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी तर योगाला जागतिक पातळीवर अनन्यसाधारण महत्व प्राप्त करून दिले. प्रत्येकासाठी व्यायाम ही आज काळाची गरज बनली. पण, त्याची किंमत आपल्याला कळत नाही. सध्या विविध व्याधी, आजारांनी माणूस त्रस्त असतो. उदा.रक्तदाब वाढला, मधुमेह झाला, सांधेदुखी वाढली. मग आपण बसल्या जागी वैद्यकिय क्षेत्राची भरती करीत रहातो. मात्र या सर्व रोगांवर मात बिनपैशाच्या व्यायाम, योग, ध्यान साधनेने होत असेल तर आपले डोळे का उघडत नाहीत ? असा सवाल त्यांनी केला. यामध्ये सातत्य ठेवलं तर रक्तदाब, मधुमेहासारख्या व्याधी आपल्या जवळ आल्या तरी निघून जातात. मी स्वअनुभवातून सांगतो. दिनचर्या बदलणे ही काळाची गरज असून यावर जो यश मिळवतो. तोच खर्या अर्थाने शारीरिकदृष्ट्या सक्षम होवू शकतो. संसार जीवनात कठोर परिश्रम करा. पण, योग, व्यायाम कधी सोडू नका. ध्यानधारणा किमान १५ मिनिटं करून बघा. आत्मबलाची क्षमता वाढल्याशिवाय रहाणार नाही. पण, हे सारं स्वत: ह्रदयातून केलं पाहिजे. पंतप्रधानांसारखी व्यक्ती जेव्हा असे उपक्रम हाती घेतो त्यात डोकावून पाहिल्यानंतर आपल्याला खर्या अर्थाने व्यायामाचे महत्व कळते. तरूण पिढीने उज्वल भविष्यासाठी या उपक्रमाकडे वळावे आणि सातत्य टिकवावे असे आवाहन त्यांनी केले. शिक्षक, प्राध्यापक या मंडळींकडे समाजाला आदर्श देणारं व्यासपीठ म्हणून ओळखल्या जातं. त्यांनी खर्या अर्थाने जनजागृती करीत समाजाला योग अभ्यासाची प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष दिशा दिली. तर लोक अनुकरण निश्चित करणार असा दावा त्यांनी केला. यावेळी उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, प्रा.बिभीषण फड, प्रा.डॉ.रविंद्र कुंबेफळकर, आनंद पाठक आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## श्री श्री रविशंकर... पान ४ वरून

मंडळाचे अध्यक्ष पत्की सर उपस्थित होते. त्यांनी यावेळी उपस्थितांना योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व सांगितले.
इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी राजनंदिनी मगर हिने योगाचे महत्त्व सर्वांना पटवून दिले. इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी योग हो या गाण्यावर नृत्य सादर केले.

शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती अनिता सूर्यवंशी मॅडम यांनी सूर्यनमस्कार घेतले आणि वृक्षासन ताडासन , शलभासन, पवन मुक्तासन इत्यादी आसणे कशी करायची याची सूचना विद्यार्थ्यांना दिली.त्यानंतर हरी ओम मेडिटेशन गुरुजींच्या आवाजात घेण्यातआले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका स्वाती पाटील मॅडम आणि सुषमा मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन शाळेतील शिक्षिका प्राजक्ता कुलकर्णी मॅडम यांनी केले.

सर्व आसनाचे सादरीकरण विद्यार्थ्यांसमोर शाळेतील शिक्षिका मनीषा अंबुरे मॅडम आणि अश्विनी कुलकर्णी मॅडम दोघींनी केले .

मोठ्या संख्येने महिला पालक, पुरुष पालक उपस्थित होते. शेवटीक्ष सर्व विद्यार्थ्यांना खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाळेतील शिक्षक वृंद व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

## योग दिन उत्साहात... पान ४ वरून

विभाग, विविध योग संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे इनडोअर हॉलमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय योगदिनाचे उद्धाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. त्या प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येतो. माणसाच्या जीवनात योगाचे अत्यंत महत्त्व असून आजची आपली जीवनशैली बदलल्यामुळे तरूण पिढी नेहमीच तणावाच्या वातावरणात वावरत असते. यापासून मुक्त राहण्यासाठी योगासारखे दुसरे माध्यम नाही. प्रत्येक नागरीकांनी योगा केला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व बौद्धिक विकासासाठी शाळा व महाविद्यालयातील तरूणाने योगा केला पाहिजे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

योग दिनाचे औचित्य साधून बीड जिल्हयातील राष्ट्रीय खेळाडू राधा वझे, सुभाषिणी वझे, शिवाजी घोडके व राधा तांबे यांचा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे हस्ते पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी योगगुरू विनायक वझे, विकास गवते, राधा तांबे यांनी उपस्थितांकडून योगासने करून घेतले. प्रोटोकॉल नुसार योगा कार्यक्रम संपन्न होत असतांनी शेवटी पूर्णवाद स्पोर्टस् ॲण्ड हेल्थ प्रमोशन अकॅडमी, बीड च्या योग खेळाडू यांनी व शिवाजी घोडके, राधा तांबे यांनी योग प्रात्यक्षिकांचे प्रदर्शन केले.

या योग दिनाच्या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. वासुदेव सोळंके, निवासी उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, तहसिलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर चिंचाणे, जिल्हा कोषागार अधिकारी लहु गळगुंडे, जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, शिक्षणाधिकारी माध्य. विभाग, संजय पंचगल्ले, प्रियाराणी पाटील, प्राथमिक विभाग, भगवान फुलारी जिल्हा आयुष अधिकारी, आनंद कुलकर्णी, पुरूषोत्तम पिंगळे, कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग रविंद्र तोंडे, जेष्ठ क्रीडा संघटक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी प्रा.जे.पी. शेळके, उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे, भगवान सोनवणे, रंगनाथ राऊत, सहाय्यक जिल्हा उपनिबंधक अशोक कदम, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, विविध कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी शहरातील शाळा, महाविद्यालय विद्यार्थी, क्रीडा संघटक, नागरिक, खेळाडू, पत्रकार, व्यवसासिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

योग दिनाचे यशस्वी आयोजन होणे कामी जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांचे मार्गदर्शनाखाली क्रीडा अधिकारी अनिकेत काळे, कालिदास होसूरकर, क्रीडा मार्गदर्शक सतिष राठोड, अविनाश पाटील, रेवननाथ शेलार, जितेंद्र आराक, धनेश करांडे, प्रिती काळे, मंगेश वडमारे, गणेश वीर यांनी परिश्रम घेतले.

## छत्रपती मल्टीस्टेटच्या... पान १ वरून

कार्यालयात अनेक खेटे घातले. पैसे मिळत नसल्याने तो इतका हताश झाला होता की, एकदा त्याने गळफास घेण्यासाठी दोर घेऊन मल्टीस्टेटचे कार्यालय गाठले होते, अशी माहिती त्याचा भाऊ आणि वृद्ध आजीने दिली. मात्र, तरीही अधिकारी किंवा पदाधिकाऱ्यांनी त्याला कोणताही प्रतिसाद दिला नाही.
अखेर, सर्व बाजूंनी निराशा पदरी पडल्याने, सुरजने ३ मे रोजी सकाळी राहत्या घरी विषारी द्रव्य प्राशन केले. त्याला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, केज आणि नंतर अंबाजोगाई येथील वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. मात्र, ४ मे रोजी उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली.
सुरजच्या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्याची आई काही वर्षांपूर्वी एका अपघातात मरण पावली असून, वडील मानसिक आजाराने त्रस्त आहेत. घरात लहान भाऊ आणि वृद्ध आजी असा परिवार आहे. सुरजच्या मृत्यूनंतर कुटुंबात कोणी पाठपुरावा करणारे नसल्याने हे प्रकरण दाबले गेले होते.
मात्र, १८ जून रोजी खळेगाव येथील शेतकरी सुरेश जाधव यांनी ९ लाख रुपयांसाठी मल्टीस्टेटच्या दारातच गळफास घेतल्यानंतर हे प्रकरण पुन्हा चर्चेत आले. या घटनेनंतर चेअरमन संतोष भंडारी यांच्यावर गुन्हा दाखल होऊन मल्टीस्टेटला सील ठोकण्यात आले. याच पार्श्वभूमीवर, सुरज तांदळे याच्या आत्महत्येसही चेअरमन संतोष भंडारी यांना जबाबदार धरून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# राष्ट्रीय महामार्गातील दोन टप्प्यांसाठी ४२१ कोटींची कामे मंजूर

**खा.बजरंग सोनवणेंनी करून दाखविले, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिले सोनवणेंच्या पाठपुराव्याला पाठबळ**



बीड: जिल्ह्यातून अनेक राष्ट्रीय महामार्ग गेले असून वाहूतुकीच्या दृष्टीने माजलगाव ते केजमधील धारूर जवळचा घाट ब्लॅकस्पॉट ठरला होता. शिवाय लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्त्यातील उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची बाबही महत्वाची होती. याबाबत खा.बजरंग सोनवणे यांनी वारंवार पाठपुरावा केला आणि या पाठपुराव्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पाठबळ देत ४२१ कोटींची ही दोन्ही कामे सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित केली आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८(सी) माजलगाव ते केजमधील धारुर जवळच्या घाट अरुंद असून चढ जास्त असल्यामुळे वारंवार अपघात होत होते, तसेच प्रवासात वेळ लागत होता. हा घाट ब्लॅकस्पॉट म्हणूनही जाहिर करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी धारुर घाटातील रस्त्याला पर्यायी मार्ग म्हणून थेटेगव्हाण मार्गे कमी चढाईचा व अधिक रुंदीचा चौपदरी रस्ता करण्यासाठी जुलै २४ पासून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचेकडे व रस्ते वाहतूक व महामार्ग विभागाकडे सतत पाठपुरावा केला. सन २५/२६ चा कृति आराखडा व वार्षिक नियोजनात सदरील काम घेण्यात आले असून या ११ कि.मी रस्त्यासाठी तब्बल १७१ कोटी रुपये खर्च प्रस्तावित केला आहे. गेल्या अनेक वर्षापासून धारुर घाटातील वाहतुक समस्या सोडवण्यासाठी आग्रही मागणी होत होती. घाटामधे चढ जास्त असल्यामुळे जड वाहतुक लांबच्या मार्गाने करावी लागत होती. अरुंद रस्त्यामुळे घाटामधे अपघाताचे प्रमाण वाढले होते. हे काम पूर्ण झाल्यास शेगाव ते पंढरपूर रस्ता वाहतुक सुरळीत होईल. माजलगाव, वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेतीमाल वाहतुक सुलभ होणार आहे. या सोबतच लातूर ते लोखंडीसावरगाव दरम्यान बर्दापुर फाटा ते लोखंडी सावरगाव रस्ता या उर्वरित लांबीचे चौपदरीकरण करण्याची मागणी करण्यात आली होती. हे २५० कोटी रुपये अंदाजित किंमत असलेल्या १८ कि.मीचे काम सन २५-२६ च्या वार्षिक नियोजनामधे मंजुरीस प्रस्तावित करण्यात आले असून दोन्ही कामे करण्यास उच्च प्राधान्य देण्यात आलेले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी राष्ट्रीय महामार्गात येणारे अडथळे आणि महत्वाच्या विषयाकडे लक्ष घातलेले आहे. धारूर घाटातील ब्लॅकस्पॉटवर अनेकदा अपघात होवून बळी गेलेले आहेत. परिणामी, अनेक संसार उघड्यावर पडलेले आहेत. आता याठिकाणी पर्यायी मार्ग काढून येथील अपघात टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आहे.

अहमदपूर ते पिंपळा धायगुडा, धायगुडा पिंपळा ते लोखंडी सावरगाव व लोखंडी सावरगाव ते मांजरसुंबा या रस्त्यांचे चौपदरीकरणाचे प्रस्ताव समितीकडून मंजुरी करुन घेऊन त्या कामांनाही प्राधान्याने मंजुरी घेण्यात येईल. मंजुरी देण्यात आलेल्या दोन्ही कामाच्या निविदा लवकरच होऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल. केंद्रीय रस्ते वाहतूक व दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांचे मोलाचे सहकार्य लाभत असून त्याबद्दल मी जिल्ह्याच्या वतीने त्यांचे आभार मानतो.

# रस्त्यासाठी पंढरपूर-खामगाव महामार्ग रोखला

## जायकोचीवाडी येथील संतप्त गावकऱ्यांचा रास्ता रोको



बीड - माजलगाव तालुक्यातील जायकोचीवाडी या गावाला जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने गावकऱ्यांचे हाल होत आहेत. आमदार, खासदारांनी वेळोवेळी नुसते आश्वासन दिले. मात्र पक्का रस्ता केला नाही. आज संतप्त गावकऱ्यांनी पंढरपूरखामगाव रस्त्यावर उतरून हा महामार्ग रोखून धरला. अर्धा ते एका तासाच्या रास्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पुर्णत: ठप्प झाली. सदरच्या रस्ता रोको आंदोलनाचे नेतृत्व आझाद क्रांती सेनेने केले होते. या दरम्यान पोलीस अधिकाऱ्यांसह अन्य संबधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येत मोर्चेकऱ्यांचे निवेदन स्विकारले.

गेल्या अनेक वर्षांपासून जायकोचीवाडी फाटा ते जायकोचीवाडी गावापर्यंत जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. त्यामुळे सदरील गावातल्या नागरीकांना त्रास सहन करावा लागतो. जो रस्ता आहे तो अत्यंत खराब आहे. त्यामुळेअपघाताचे प्रमाणही वाढत आहेत. सदरचा रस्ता करण्यात यावा या मागणीसाठी शासन दरबारी आणि प्रशासन दरबारी गावकऱ्यांनी वेळोवेळी निवेदने दिले. निवडणुका आल्या की, आमदार-खासदार हे रस्त्याबाबत आश्वासने देतात. मात्र निवडणुका झाल्या की लोकांच्या मुलभूत गरजांकडे दुर्लक्ष करतात. आज आझाद क्रांती सेनेच्या वतीने सदरचा रस्ता व्हावा या मागणीसाठी पंढरपूर-खामगाव या महामार्गावर रस्ता रोको करण्यात आला. शेकडो गावकरी रस्त्यावर उतरत पक्का रस्ता द्या नाहीतर खुर्च्या खाली करा, अशा घोषणा देत संतप्त होत महामार्गावर ठिय्या मांडला. तब्बल अर्ध्या ते एक तासाच्या रस्ता रोको आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णत: ठप्प झाली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजुने वाहनांच्या मोठ्या रांगा दिसून येत होत्या. आंदोलनस्थळी पोलीस प्रशासनासह वरिष्ठ अधिकारी डेरेदाखल झाले. आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांचे निवेदन त्यांनी स्विकारले.

# आ.सुरेश धसांचा नागरीकासह योग दिवस उत्साहात साजरा

आष्टी - आपल्या भारताच्या रताच्या प्राचीन विद्येपैंकी एक म्हणजे योग निरोगी शरीर, उत्तम आरोग्य आणि ऊर्जा प्राप्तीचा स्त्रोतआहे. जागतीक स्तरावर योगाचे महत्त्व पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी पटवून दिले आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात प्रत्येकजण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. मात्र आपण आपल्या शरिराकडे लक्ष देणे गरजेचे असून जर आपल आयुष्य उत्तम आणि निरोगी जगायचंअसेल तर प्रत्येकाने स्वतःसाठी दिवसातील एक तास नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे. तसेच योग आणि उत्तम आहार हीच आपल्या निरोगी दीर्घायुष्याची गुरुकिल्ली आहे असे प्रतिपादन आ.सुरेश स यांनी केले दि.२१ जून रोजी अनिषा ग्लोबल शैक्षणिक संकुलात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्ताने आयोजित कार्यक्रमात आ.धस बोलत होते.योग प्रात्यक्षिक करण्यासाठी नितिन आळकुटे हे होते.पुढे बोलताना धस म्हणाले की जागतिक स्तरावर योगाचे महत्त्व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पटवून दिले आहे. सध्याच्या काळात धावपळीचे जीवन झाले आहे. जो माणूस काम करतो त्यांना वेळ पुरत नाही. परंतु हे सर्व करतांना आपण आपल्या शरिराकडे लक्ष देणे गरजेचे असून प्रत्येकांनी आपल्यासाठी एक- दोन तास नियमित देणे गरजेचे असल्याचेही आमदार धस यांनीसांगितले. त्यांनी सर्वांना योगासने करुन दाखवत त्या योगाचे महत्त्व सांगितले. यावेळी पंचायतचे सभापती शेख शरीफ, ॲड. अविनाश निंबाळकर, किशोर झरेकर, बाबुराव कदम, बाळासाहेब घोडके, दिपक निकाळजे, कपिल अग्रवाल, राजेंद्र लाड, सचिन रानडे, शरद रेडेकर यांच्यासह आदि उपस्थित होते.योग शिक्षक आळकुटे यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून मार्गदर्शन केले.यावेळी आष्टी शहरातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, शिक्षक, सामाजिक संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक
विवेक सिंधु
रविवार, दि.२२ जून २०२५ पान ४

# योग दिन उत्साहात साजरा

**ताण तणावापासून मुक्त राहण्यासाठी योगासने करणे महत्वाचे : जिल्हाधिकारी**




बीड – धकाधकीच्या जीवनात ताणतणावातून तणावमुक्त राहण्यासाठी शारीरिक व मानसिक क्षमता कायम राहावी यासाठी दररोज योगासने करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले.

योग हा पारंपारीक पद्धतीने पाच हजार वर्षापासून चालत आला असून पूर्वी वडीलधारी मंडळी योगाच्या माध्यमातून स्वतःला निरोगी व तणावमुक्त ठेवण्यासाठी योगासने, ध्यान साधना करत असत. विद्यार्थ्यांना आपले ध्येय साध्य करण्यासाठी व एकाग्रता साधण्यासाठी ध्यान धारणा (मेडीस्टेशन) करणे ही काळाची गरज झाली असून शारिरीक व मानसिक स्वास्थ्य निरोगी ठेवण्यासाठी ध्यान साधनेचा जीवनात नियमित उपयोग करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी आणि उपस्थित नागरिकांना केले.

जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा शिक्षण

पान ३ वर

## श्री श्री रविशंकर विद्या मंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी) २१ जून २०२५ वार शनिवार या दिवशी श्री श्री रविशंकर विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमाचे सुरुवात प्रतिमा पूजनाने झाली. यासाठी शाळेचे अध्यक्ष पारगावकर सर सचिव शेख पाशा सर स्नेहा पारगावकर मॅडम मुख्याध्यापिका अनिता सूर्यवंशी मॅडम कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय शिक्षण प्रसारक

पान ३ वर

# मुक्ताईंची पालखी जिल्ह्यात दाखल झाल्याने वातावरण भक्तिमय; गढी येथील जयभवानी मंदिरावर रिंगण सोहळा



गेवराई – जय मुक्ताबाई... विठ्ठल विठ्ठल ! या गगनभेदी जयघोषांनी गेवराईच्या रस्त्यावर भक्तीचा महासागर उसळला. संत मुक्ताबाईच्या पवित्र पादकांचे दर्शन घेण्यासाठी शहरात हजारो भाविकांचा जनसागर लोटला आणि संपूर्ण नगरच जणू भक्तीरसात न्हालं. मुक्ताईची पालखी गढी येथे पोहचताच रिंगण सोहळा पार पडला.

तापी तिरावरील मुक्ताई नगर येथून प्रस्थान केलेली ही पालखी ६ जिल्ह्यांतून सुमारे ६०० किलोमीटरचा पायी प्रवास करत, २८ मुक्कामांनंतर ३ जुलै रोजी पंढरपुरात विठुरायाच्या भेटीला पोहोचणार आहे. सजवलेला रथ, चांदीच्या पादुका, आणि एक हजारांहून अधिक वारकऱ्यांचा जल्लोष या सोहळ्याचे आकर्षण ठरले आहे.

गुरुवारी सायंकाळी संत मुक्ताबाई पालखीचे गेवराई शहरात आगमन होताच, ढोल–ताशांचा कडकडाट झाला, टाळ–मृदंगांचा निनाद आसमंतात घुमू लागला आणि हरिनामाचा गजर शहराच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. महिलांच्या रांगांमध्ये भगवे झेंडे लहरले, तर लहानग्यांनी हातात टाळ घेऊन

पान ३ वर

# पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे योगाला जागतिक पातळीवर महत्व प्राप्त झाले

**सदृढतेसाठी व्यायाम सातत्य महत्वाचे – प्रवक्ते राम कुलकर्णी**





अंबाजोगाई (प्रतिनिधी)– योग अभ्यास ही परंपरा पुरातन काळापासून सुरू असून ऋषी–मुनींनी तर योग आधारे नवचैतन्य प्राप्त केले. सामाजिक कार्याला चालना देणारी व्यवस्था उभी राहिल्यानंतर आदर्श प्रस्थापित होतात. २०१५ पासून पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी योगाला जागतिक पातळीवर महत्व प्राप्त करून दिले. स्वतःच्या शरीर सदृढतेसाठी व्यायाम योग अत्यंत महत्वाचे असुन एक रूपाया खर्च न होता असाध्य रोग पळून जातात. केवळ त्यातलं सातत्य टिकवणं महत्वाचे, कुणी करा म्हणुन करण्यापेक्षा स्वतः अंतर्मुख होवून याकडे पाहिलं तर त्याची किंमत निश्चित कळेल असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केले.

शहरातील खोलेश्वर महाविद्यालयातील क्रिडा विभागाच्या वतीने जागतिक योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या शिबीर उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्यासपीठावर योगगुरू अंबादास भटांगरे, प्राचार्य डॉ.

पान ३ वर

# सामाजिक कार्यकर्ते अक्षयभैय्या जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबीर; ६० रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग






अंबाजोगाई (प्रतिनिधी) – सामाजिक कार्यकर्ते अक्षयभैय्या जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक २० जून रोजी जैन गल्ली येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीराला युवकांसह महिलांनीही मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. एकूण ६० जणांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपली.

या उपक्रमात तरुणांचा विशेष सहभाग राहिला असून महिलांची उपस्थिती हे या शिबीराचे विशेष आकर्षण ठरले. गेल्या चार वर्षांपासून सातत्याने आयोजित होत असलेल्या या उपक्रमाचे हे यंदाचे पाचवे वर्ष होते. रक्तदान शिबीर यशस्वी होण्यासाठी अक्षयभैय्या जाधव यांचा मित्रपरिवारही मोठ्या संख्येने सहभागी झाला होता.

या वेळी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागातील डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी आवश्यक वैद्यकीय सेवा पुरवून शिबीराला सहकार्य केले. या समाजोपयोगी उपक्रमामुळे रक्तदानासंदर्भात जनजागृती होण्यासाठी मदत झाली असून अक्षयभैय्या जाधव आणि त्यांच्या टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# आदर्श विद्यालयात योगासने करून योग दिन साजरा



केज – बनसारोळा (ता. केज) येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांनी योगासने करीत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला.

बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग गुरु म्हणून शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक देवगावकर यांनी योगासने करून दाखवली. शाळेतील सर्व विद्यार्थी व सर्व कर्मचारी यांनी योगासने केली. तर विद्यार्थ्यांना अल्पोपहार म्हणून केळी व पुलावाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे सचिव बालासाहेब काकडे, मुख्याध्यापिका सिंधू चव्हाण, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# ग्रामीण विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षांना सामर्थ्याने सामोरे जावे : मुख्याद्यापक पी.एम.देशमुख

**पोलीस कॉन्स्टेबलपदी निवडीबद्दल वैशाली काकडेचा सत्कार**



केज – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परीक्षा असो. नीट – जी सारख्या परीक्षा असो, त्यांना सामर्थ्याने सामोरे जाण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्याद्यापक पी. एम. देशमुख यांनी केले.

केज शहरातील जय भवानी कन्या प्रशाला या शाळेची माजी विद्यार्थिनी वैशाली भगीरथ काकडे हिची पोलीस दलामध्ये कॉन्स्टेबल या पदावर निवड झाली. त्याबद्दल शाळेच्या वतीने तिचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक पी. एम. देशमुख हे बोलत होते. तर के. व्ही. खुळे, जय भवानी कन्या प्रशाला प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका गीता जगताप, सुरेश गिरी, पी. आर. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना मुख्याद्यापक देशमुख म्हणाले की, या शाळेच्या अनेक विद्यार्थिनी आज मोठमोठ्या पदावर कार्यरत आहेत. शिक्षणमहर्षी कै. बाबुरावजी आडसकर यांनी त्याकाळी मुलींची शाळा काढण्याचा उदात्त हेतू समोर ठेवला होता. ग्रामीण भागातील मुलींना न्याय मिळावा हाच प्रमुख उद्देश त्यांचा होता. त्यालाच अनुसरून आज आम्ही कार्यरत असल्याचे सांगितले.

यावेळी वैशाली काकडे हिने जय भवानी कन्या प्रशाला या शाळेमुळे व शाळेने दिलेल्या संस्कारामुळे, आई–वडिलांच्या अथक प्रयत्नामुळे मी हे

पान ३ वर

# सततच्या पावसाने कुजले सोयाबीन; शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

नेकनूर : मे महिन्यात सुरू झालेल्या पावसामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यातच बहुतांश शेतकऱ्यांनी पेरणीची लगबग केली. प्रामुख्याने सोयाबीनला प्राधान्य दिले, मात्र पावसाच्या दमदार आगमनामुळे अनेक ठिकाणी पेरलेले सोयाबीन कुजले, पावसाच्या जोराने दबून उगवलेच नाही. त्यामुळे शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. नेकनूर परिसरातील अनेक शेतकऱ्यांना सोयाबीनची दुबार पेरणी करावी लागली आहे.

मे महिन्यात जोरदार बरसलेल्या पावसाने शेतकऱ्यांना मशागतीच्या कामांना वेळ मिळाला नाही. थोडीशी सवड होताच शेतकऱ्यांनी मशागतीला वेग देऊन पेरणीची लगबग केली. नेकनूर परिसरातील कापूस लागवड पूर्णपणे गायब झाली असून सोयाबीनचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढल्याचे पहायला मिळते.

सोयाबीन पेरणी करताना शेतकऱ्यांनी विविध कंपन्यांच्या बॅगा सोबत घरच्या बियाणाला प्रधान्य दिले. मात्र पेरणीनंतर जोराचा पाऊस लागून राहिल्याने अनेक ठिकाणी बियाणे उगवले नाही जमिनीतच सडले यामुळे अनेक क्षेत्रावर दुबार पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली. बियाणे –खत वाया गेल्याने शेतकऱ्यांना पेरणीतच मोठा फटका बसला आहे.

दुबार पेरणीचे तरी सोयाबीन उगवावे या आशेवर शेतकरी आहे. गतवर्षी उगवलेले सोयाबीन गोगलगायीच्या संकटात सापडले होते यावर्षी पेरणीतच पावसाने सोयाबीन उगवणीला अडचण निर्माण केली.पाच तारखेला दोन एकर सोयाबीनची पेरणी केली मात्र लागलीच मोठ्या पावसाने पेरलेले सोयाबीन जमिनीच्या वर येऊ शकले नाही ते कुजले त्यामुळे पुन्हा पेरणी करावी लागली यामुळे पेरणीचा खर्च वाढला. सोयाबीनचे भाव शासनाने वाढवावेत तरच या पिकातून काही पदरात पडेल.

पाच तारखेला दोन एकर सोयाबीनची पेरणी केली मात्र लागलीच मोठ्या पावसाने पेरलेले सोयाबीन जमिनीच्या वर येऊ शकले नाही ते कुजले त्यामुळे पुन्हा पेरणी करावी लागली यामुळे पेरणीचा खर्च वाढला. सोयाबीनचे भाव शासनाने वाढवावेत तरच या पिकातून काही पदरात पडेल.

